महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

जा.क्र/म/व/स्पर्धा-परीक्षा/१७८६/२०२६-२७ दि:-०६/१०/२०२६

# परिपत्रक

**विषय :- दि.०७ ते ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेकरिता महाराष्ट्र व दिल्ली येथील परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्याबाबत.**

महाज्योती व वनार्टी संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा/अभियांत्रिकी सेवा/संयुक्त गट ब व क) तसेच लष्करातील सैनिक भरती परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी घेण्यात येणारी चाळणी परीक्षा दि.०७/१०/२०२६ ते दि.०९/१०/२०२६ रोजी नियोजित करण्यात आलेली आहे.

सदर प्रशिक्षणाकरिता दि.०७/१०/२०२६ ते दि.०९/१०/२०२६ रोजी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेकरिता विद्यार्थांनी दिल्ली व महाराष्ट्र येथील परीक्षा केंद्र बदलून देण्याबाबत संबंधित कार्यालयास विनंती केलेली होती, त्यानुसार विद्यार्थांनी केलेली विनंती विचार घेता ज्या विद्यार्थांना दिल्ली व महाराष्ट्र येथील परीक्षा केंद्र बदलून हवे होते अशा विद्यार्थांकडून त्याबाबतचा अर्ज दि.०५/१०/२०२६ रोजी रात्री ०९:०० वाजता पर्यंत महाज्योती व वनार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर मागविण्यात आलेले होते.

त्याद्वारे ज्या विद्यार्थांनी सदरचा अर्ज महाज्योती व वनार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर सादर केलेला आहे अशा सर्व विद्यार्थांना त्यांचा मागणीनुसार परीक्षा केंद्र बदलून देण्यात आलेला आहे, सदर परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात आलेली लिंक चा वापर करून अद्यावत प्रवेश पत्र डाउनलोड करता येईल, सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती), नागपूर**

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(वनार्टी), नागपूर**